# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २४०/२०२४ दिनांक:- २६/०६/२०२४.

## "खून करुन पुरावा नष्ट करणाऱ्या पाहीजे आरोपीस १२ वर्षानंतर उत्तरप्रदेश येथुन अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश"

दिनांक ०१.०१.२०१३ रोजी १९.३० वाजता ते दिनांक ०२.०१.२०१३ रोजी सकाळी ०९.०० वाजेचे दरम्याण गाळा क्र.०६, सुरेश सिंग चाळ, गावदेवी, मौजे धानीव, नालासोपारा पुर्व ता.वसई, जि.पालघर येथील दुकानात मयत महेशकुमार राम चंद, वय-४४ वर्षे, यास कोणीतरी अज्ञात इसमाने त्याचे डोक्यावर, शरीरावर टिकाव व फावडयाने मारहाण करुन दोरीने गळा आवळुन मयत यास गंभीर दुखापत करुन त्याची क्रुर हत्या करुन पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने मयत याचे प्रेत घटनास्थळीच जाळण्याचा प्रयत्न केल्याने नमुद अज्ञात इसमा विरुध्द वालीव पो.स्टे. गुन्हा नोद क्र. ०१/२०१३ भादविसक ३०२, २०१, ३४ प्रमाणे दिनांक ०२.०१.२०१३ रोजी गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाच्या तपासात आरोपी नामे १) अमीर अब्बास मोईद्दीन शेख २) मोहमंद नईम बन्नेमिया अन्सारी यांना अटक करुन त्याचे विरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते. परंतु पाहिजे आरोपी नामे हिरा ऊर्फ खुर्शीद आलम मोहम्मद हनीफ अन्सारी हा गुन्हा दाखल झाले पासुन पोलीसांना मिळुन येत नव्हता.

वरीष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर व संवेदनशील गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेणेबाबत आदेश केले होते. वरील गुन्हा अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्याने तसेच नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे हिरा ऊर्फ खुर्शीद आलम मोहम्मद हनीफ अन्सारी याचा यापुर्वी सर्वोतोपरी शोध घेऊन देखील तो गेल्या १२ वर्षापासुन मिळुन येत नव्हता. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी अधिकारी, राहुल राख यांनी सपोनिरी/दत्तात्रय सरक, पोहवा/शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे असे तपास पथक तयार केले. सदर पथकाने सदर गुन्हयाची वालीव पोलीस ठाणेतुन माहीती घेऊन यातील पाहीजे आरोपीया शोध घेत असताना आरोपीचे भाउ दिल्ली येथे महिलांचे पर्स बनविण्याचे काम करत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार पोलीस पथक दिल्ली येथे जावुन आरोपीचे भाउ काम करत असलेल्या ठिकाणी गोपणीय माहिती काढली असता आरोपी हा मोबाईल फोन वापरत नसुन तो कोणाच्याही संपर्कात नसल्याची माहिती मिळाली. त्यांनतर सलग ०२ महिन्यांपासुन अहोरात्र मेहनत घेवुन तपासात सातत्य ठेवून आरोपीची गोपणीय माहिती काढली असता आरोपी हा त्याचे राहतेगावापासुन लांब शेतात एकटाच राहत असल्याची माहिती प्राप्त झाल्याने तपास पथक सपोनि/दत्ताजय सरक, पो.हवा/शिवाजी पाटील, गोविंद केन्द्रे असे सहसवान, उत्तरप्रदेश येथे जावुन तेथील स्थानिक पोलीसांचे मदतीने सतत १० दिवस शेतावर पाळत ठेवुन सापळा लावला असताना आरोपी पळुन जात असताना आरोपी नामे पाहीजेत आरोपी नामे हिरा ऊर्फ खुर्शीद आलम मोहम्मद हनीफ अन्सारी, वय-३९ वर्षे, रा. मोहल्ला कटरा, शहबाजपुर कस्बा, थाना सहसवान, जनपद बदायु, उत्तरप्रदेश यास दिनांक २४.०६.२०२४ रोजी १३.३० वाजता शिताफिने ताब्यात घेण्यात आलेले आहे.

नमुद पाहीजे आरोपीकडे केलेल्या तपासात त्याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास मा. मुख्य न्यायीक मॅजिस्ट्रेट, बदायु, उत्तरप्रदेश येथे हजर करुन तीन दिवसांचे ट्रान्झीट रिमांड प्राप्त करण्यात आले आहे. आरोपीस पुढील कारवाई करीता वालीव पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले असुन अशा प्रकारे खून करुन पुरावा नष्ट करणाऱ्या गेले १२ वर्षापासून पाहीजे असणाऱ्या आरोपीस पकडण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश आले आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. प्रकाश गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.नि./राहुल राख, पो.नि./धनांजय पोरे, सपोनि/दत्तात्रय सरक, नितीन बेन्द्रे, पोउपनिरी/हितेंन्द्र विचारे, सफौ/श्रीमंत जेधे, पोहवा/ शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, संतोष मदने, हनुमंत सुर्यवंशी, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, राजविर संधु, प्रविणराज पवार, सतिष जगताप, राजाराम काळे, महेश वेल्हे, संग्राम गायकवाड, अनिल नागरे, सतिष जगताप, पोशि/अखिल सुतार, नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी व सपोउपनि/संतोष चव्हाण, सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केली आहे.




----------oooooo-----------